## प्रेस नोट दि.२५/०६/२०१८

### (फरार गुन्हेगारास २ पिस्तोलासह गुन्हे शाखेचे गुंडा स्कॉड दक्षिण विभागाने केले जेरबंद )

पुणे शहर गुन्हेशाखेकडील संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक दक्षिण विभागाचे इनचार्ज पोनिरी श्री.राम राजमाने व त्यांचा स्टाफ हे दि.२३/०६/२०१८ रोजी विश्रामबाग पोलीस स्टेशनचे हद्दीत गुन्हेगारी पेट्रोलींग चेक करीत असताना पो.निरी.राजमाने यांना त्यांचे बातमीदारा कडुन बातमी मिळाली कि, रेकॉर्डवरील गुन्हेगार व विश्रामबाग पो.स्टे. येथे दाखल असलेल्या दंगलीच्या गुन्हयातील फरारी आरोपी शुभम भोसले हा त्याचे मित्रांला भेटण्यासाठी नदीपात्रा जवळील नाना-नाणी उदयानाचे मागील बाजुस असणारे आपटे घाटाकडे जाणारे रोडवरील म्हसोबा मदिंराचे समोर,शनीवारपेठ,पुणे येथ या ठिकाणी त्याचे मित्रास भेटायला येणार असुन, त्याचेकडे पिस्तोल आहे.अशी खात्रीशीर बातमी मिळताच सदर ठिकाणी सापळा लावुन इसम नामे शुभम राजेश भोसले वय २२ रा.१९५ कसबापेठ,फणेआळी तालीम समोर,पुणे यास ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे डावे व उजवे कमरे जवळ प्रत्येकी एक देशी बनावटीचे पिस्तुल असे एकुण २ गावठी कट्टा व ४ जिवंत काडतुसे आले.असा एकुण मिळुन ५२,०००/- चा मुद्देमाल गुन्हयाचे अनुषंगाने जप्त करण्यात आला आहे. त्याचे विरुध्द कैलास साळुंके यांनी विश्रामबाग पो.ठाणे गु.र.न. १४४/२०१८ आर्म ॲक्ट कलम ३ (२५) व मुंबई पोलीस ॲक्ट कलम ३७ (१), सह १३५ प्रमाणे फिर्याद देवून गुन्हा दाखल करणेत आला असुन त्याची मा.न्यायालयातुन पोलीस कस्टडीची रिमांड घेण्यात आली आहे. **गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस फौजदार राजेंद्रसिंग चौहान हे करीत आहेत.**

आरोपी नामे शुभम भोसले हा फरासखाना पोलीस स्टेशनच्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याचे विरोधात फरासखाना पोलीस स्टेशन येथे एकुण ३ गुन्हे दाखल आहे. तसेच विश्रामबाग पोलीस स्टेशन कडील शरीराविरूध्दच्या गुन्हयामध्ये तो फरारी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**सदरची कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे श्री.प्रदिप देशपांडे सो-अपर पोलीस आयुक्त, गुन्हे.श्री.पंकज डहाणे सो,पोलीस उप आयुक्त,गुन्हे, श्री.समीर शेख सो-सपोआ.,गुन्हे-१,यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा स्कॉड दक्षिण विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.राम राजमाने, सहा.पो.फौज.राजेंद्रसिंग चौहान, रविंद्र कदम, सुनिल चिखले, सर्फराज शेख, प्रशांत पवार, ज्ञानेश्चर देवकर, संजय बरकडे,किरण ठवरे, रमेश चौधर, प्रविण पडवळ,राकेश खुणवे, कैलास सांळुके,विवेक जाधव यांनी केली आहे.**